# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

जाहिरात क्र.२०, दिनांक २२/०३/२०१६ चे शुध्दीपत्रक

विद्यापीठाच्या विविध विभागांतील **डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, टेक्निकल लिडर, ई-कन्टेन्ट ॲडमिनिस्ट्रेटर, संपादक, उपसंपादक आणि सहायक वसतिगृहप्रमुख (मुले/मुली)** ही पदे विद्यापीठ निधीतून हंगामी स्वरुपात करार पध्दतीने ठराविक कालावधीकरिता भरण्यासाठी दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी जाहिरात क्र.२० प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमधील **'वयोमर्यादा'** या मुद्दयामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे :-

१. सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि अशा विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.

२. खुल्या तसेच राखीव प्रवर्गातील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अपंग व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. पअंक - १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ मधील तरतुदीनुसार गट 'क' मधील पदांसाठी 'सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या अंशकालीन उमेदवारांकरिता उच्चतम वयाची अट वयाच्या ४६ वर्षे पर्यंत शिथिलक्षम राहील.

५. माजी सैनिक सशस्त्र दलात किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

६. जनगणना (सन १९९१ ची) उमेदवारांसाठी कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्षे शिथील केली जाईल. त्याबाबत अर्जदार / उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. १०९७/प्र.क्र.७७/९७१६-अ, दि.१२/३/१९९८ मधील निकष पूर्ण केलेले असावे.

तरी सर्व संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

जाहिरात क्र : २४
दिनांक : ०९/०४/२०१६

डॉ.नरेंद्र मा. कडू
कुलसचिव